| | | |
|---|---|---|
| MHPU120004522025 | दाखल दिनांक | १७/०५/२०२५ |
| | नोंदणी दिनांक | १७/०५/२०२५ |
| | निकाल दिनांक | ०५/०८/२०२६ |
| | कालावधी | वर्षे महिने दिवस<br>०१ ०२ १९ |

**भोर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय, कनिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी सौ. मिना वामन जाधव )**

**नियमित फौजदारी खटला क्र. ९८/२०२५. निशाणी क्र. १९.**

**गुन्हा नोंद क्र. १०८/२०२५ राजगड पोलिस ठाणे**

| | | |
|---|---|---|
| **अभियोगपक्ष** | : | **महाराष्ट्र शासन तर्फे राजगड पोलीस स्टेशन,** |
| **अभियोगपक्षातर्फे प्रतिनिधीत्व** | :: | **सहा. सरकारी अभियोक्ता<br>श्री. वाय.पी. पोरे** |
| **आरोपी** | :: | **१- राजेंद्र अजित चव्हाण<br>वय- ३४ वर्षे, व्यवसाय- नोकरी<br>२- सौ. छाया अजित चव्हाण<br>वय – ६५ वर्षे, व्यवसाय - सुखवास्तु<br>रा- मु.पो. पेंजळवाडी, ता.भोर, जि. पुणे** |
| **आरोपी तर्फे प्रतिनिधीत्व** | :: | **ॲड.श्री. खोपडे** |

**भाग – ब**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद 44 (ii) अन्वये)**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १५/०३/२०२५ |
| फिर्याद दाखल तारीख | १६/०३/२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १७/०५/२०२५ |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | २३/०४/२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २३/०४/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याची तारीख | ०५/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय तारीख | ०५/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भातील आदेशाची तारीख | निरंक. आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

**आरोपींचा तपशील**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं.कलम४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **राजेंद्र अजित चव्हाण** | भा. ना. सु. सं. क.३५(३)प्रमाणे नोटीस | निरंक | भा.न्या.सं. क.११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३), ३(५) अन्वये. | निर्दोष | निरंक | निरंक |
| २ | **छाया अजित चव्हाण** | भा. ना. सु. सं. क.३५(३)प्रमाणे नोटीस | निरंक | | निर्दोष | निरंक | निरंक |

**भाग – क**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद 44 (ii) अन्वये)**

**अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार / बचाव पक्षातर्फे साक्षीदार / न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष –**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | गौरी राजेंद्र चव्हाण | १५ | फिर्यादी |

**ब. बचाव पक्ष –**

| अनु.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

**क. न्यायालयीन साक्षीदार –**

| अनु.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

**अ.अभियोग पक्षामार्फत निशाणी –**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | १६/पी.डब्ल्यु.१ | फिर्याद |

| | | |
|---|---|---|
| ०२. | १७/पी.डब्ल्यु.१ | छापील प्रथम खबर अहवाल |

**ब.बचाव पक्षामार्फत निशाणी –**

| **अनु. क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| निरंक | | |

**क.न्यायालया मार्फत निशाणी –**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| **१** | **१३** | **तडजोड पुरशिस** |

**ड. भौतिक वस्तु**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| निरंक | | |

**–:: न्या य नि र्ण य ::–**

(दिनांक ०५/०८/२०२६ रोजी पारीत)

प्रस्तुतचे प्रकरण आरोपींविरुध्द भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३) सह ३(५) अन्वये चालविण्यात आले आहे.

**०२.** अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की, १५/०३/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता फिर्यादीने तिचे घरच्यांना फोन करायला सांगितले म्हणुन आरोपी राजेंद्र चव्हाण याने त्यांना शिविगाळ करुन हाताने मारहाण केली. त्याचदिवशी सायंकाळी ६.०० वाजता आरोपी राजेंद याने घरी येवुन कोमलला फोन केला या कारणावरुन फिर्यादी हिला शिविगाळ व दमदाटी करण्यास सुरुवात केली. त्यावेळी आरोपी क्र.२ हि फिर्यादीला म्हणाली की, ''तिला किती वेळा सांगितले की, येथे राहायचे नाही तरी ती ऐकत नाही, घरामध्ये चो–या करते असे सांगुन शिविगाळ केली'' आरोपी क्र. २ हिने आरोपी क्र. १ याला काठी आणुन दिली व आरोपी क्र. १ याने त्या

काठीने तिला पायावर, हातावर तसचे तोंडावर मारहाण करुन दुखापत केली. आरोपी क्र. १ याने तिला तुझ्याकडे पाहुन घेतो अशी धमकी दिल्याने ती त्याच्या तावडीतुन सुटुन गुणंद येथे राहणारी बहिण सुप्रिया निगडे हिचेकडे गेली. तेथुन ती किकवी चौकी येथे गेली. पोलिसांनी तिला दवाखान्यात जाण्याची उपचारयादी दिली. त्यानंरत तिने भोर उपजिल्हा रुग्णालय येथे जावुन उपचार घेवुन झालेल्या घटनेबाबत तक्रार दिली.

**०३.** सदर फिर्याद वरुन गुन्हा रजि.क्र. १०८/२०२५ हा दाखल करण्यात आला व तपास पो.हवा. एम.एम.निंबाळकर यांचेकडे देण्यात आला. गुन्हयाचे तपासादरम्यान तपासी अधिकारी यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. गुन्हयात वापरलेली काठी जप्त केली. तपासाअंती आरोपींविरूध्द गुन्हा दर्षक पुरावा आढळून आल्याने उपरोक्त कलमांन्वये दोषारोप पत्र दाखल केले आहे.

**०४.** आरोपीविरुध्द निशाणी क्र. ७ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३), ३(५) नुसार दोषारोप ठेवण्यात आला. आरोपींनी दोषारोप अमान्य करुन संपरिक्षेची मागणी केली. संपरिक्षेदरम्यान अभियोग पक्षाने केवळ फिर्यादीला साक्षीदार म्हणुन तपासले. आरोपींविरुध्द गुन्हादर्शक पुरावा नसल्याने निशाणी क्र.१ अन्वये आदेश परीत करण्यात येवुन त्यांचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३५१ अन्वयेचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**०५.** आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेले आरोप व अभियोगपक्षाने सादर केलेला पुरावा पाहता खालील प्रश्न माझ्या विचाराधीन येतात त्याचे कारणांसह निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **०१.** | अभियोगपक्षाने हे सिध्द केले आहे काय की, दिनांक १५/०३/२०२५ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता चे सुमारास मौजे पेंजळवाडी गावचे हद्दीत फिर्यादीचे राहते | **नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| | घरामध्ये ता. भोर, जि. पुणे येथे आरोपींनी हेतुपुरस्पर फिर्यादीस काठी या घातक हत्याराने जे गुन्हयाचे हत्यार म्हणुन वापरले असता मृत्युस कारणीभुत ठरु शकते अशा हत्याराने मारहाण करुन दुखापत केली ? | |
| ०२. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले आहे काय की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीस हेतुपुरस्सर हाताने मारहाण करून दुखापत केली.? | **नकारार्थी.** |
| ०३. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले आहे काय की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ करुन तिचा अपमान केला व तिला सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास अथवा इतर कुठलाही गुन्हा करण्यास प्रक्षोभित केले? | **नकारार्थी.** |
| ०४. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले आहे काय की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ व दमदाटी करुन फौजदारी पात्र धाकदपटशा केला ? | **नकारार्थी.** |
| ०५. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

**–:: का र ण मी मां सा :–**

**मुद्दा क्र. ०१ ते ०४ बाबत–**

**०६.** अभियोगपक्षाची साक्षीदार फिर्यादी गौरी राजेंद्र चव्हाण हिने तिच्या अभिसाक्षीत कथन केले आहे की, तिच्या घरी ती, तीची सासु, नवरा व दोन मुले राहतात. आरोपी राजेंद्र हा तिचा नवरा असुन छाया ही तिची सासु आहे. एक वर्षांपुर्वी तिचा आरोपींशी किरकोळ वाद झाला होता. त्यामुळे तिने किकवी पोलिस दुरक्षेत्र येथे

तक्रार दिल्याचे कथन केले असले तरी तक्रार मधील मजकुराबाबत अनभिज्ञता दर्शविली आहे. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास साक्षीकामी काहीएक सहाय्य केले नसल्यामुळे सरकारी वकीलाच्या तोंडी विनंतीवरुन तिचा उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात आली. उलटतपासामध्ये सदर साक्षीदाराने मान्य केले आहे की, आरोपी व तिच्यात आता वाद राहिलेला नसुन तिची आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार राहिलेली नाही. परिणामी, सदर साक्षीदाराचा पुरावा कोणत्याही प्रकारे अभियोग पक्षास साहयभूत ठरत नाही.

**०७.** अभियोग पक्षाने सदर साक्षीदाराव्यतिरिक्त इतर कोणत्याही साक्षीदाराचा पुरावा न्यायलयासमक्ष दिलेला नाही. फिर्यादी गौरी हिचा पुरावा पाहिला असता तिचे पुराव्यावरुन तिने फिर्याद नि. क्र. १६ दिल्याचे सिद्ध होते. परंतु फिर्यादीतील मजकूर आणि न्यायालयासमोरील आलेला पुरावा यात ब–याच विसंगती आणि त्रुटी आहेत. फिर्यादीने आरोपींनी तिला शिवीगाळ दमदाटी करुन काठीने व हाताने मारहाण करुन जखमी केल्याचे स्पष्टपणे नाकारले आहे. परिणामी, फिर्याद नि. क्र. १६ संशयापलीकडे सिद्ध झालेली नाही, असे माझे मत झाले आहे. फिर्यादी हिचा पुरावा घटनेच्या अनुषंगाने अस्पष्ट व संदिग्ध स्वरुपाचा आहे.

०८. फौजदारी न्यायशास्त्रानुसार आरोपीस दोषी ठरविण्यासाठी अभियोग पक्षाने सादर केलेला पुरावा हा निश्चित, ठोस, सुसंगत आणि संशयाच्या पलीकडे सिद्ध होणारा असावा लागतो. परंतु सदर खटल्यातील पुरावे हे विसंगत, अपुरे व अस्पष्ट स्वरूपाचे असल्याने त्यावर विश्वास ठेवणे अशक्य ठरते. सदर खटल्यात बचाव पक्षातर्फे कोणत्याही प्रकारचा कागदोपत्री पुरावा देखील सिध्द करण्यात आलेला नाही. आरोपींनीच गुन्हा केल्याचे संशयापलीकडे सिध्द झालेले नाही. अत्यंत महत्वाची बाब म्हणजे सदर खटल्यातील साक्षीदार अभियोग पक्षाच्या कथनास दुजोरा देत नाही. अशा परिस्थितीत संचीकेत आलेल्या एकूण पुराव्याचे बारकाईने अवलोकन करता तसेच त्यांच्यातील वाद मिटल्याबाबत दाखल केलेल्या पुरसिस नि. क्र. १३ चा विचार करता अभियोगपक्ष हा

आरोपींविरुद्ध ठेवण्यात आलेले आरोप संशयापलीकडे सिद्ध करु शकला नाही, असे माझे मत झाले आहे. सबब, मी मुद्दे क्र. १ ते ४ यांची उत्तरे नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ०५ बाबत–**

**०९.** फौजदारी न्यायप्रणालीचे मुलभूत तत्व असे आहे की, फौजदारी गुन्हयामध्ये आरोपीस दोषी धरण्याकरीता त्याच्यावर ठेवण्यात आलेले आरोप अभियोग पक्षाने संशयापलीकडे सिद्ध करणे आवश्यक आहे. परंतु सदर बाबी या खटल्यामध्ये आढळून येत नाही. परिणामी, आरोपीस निर्दोष मुक्त करणे योग्य व न्यायोचित ठरते. म्हणून मी मुद्दा क्र. ५ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करीत आहे.

**:: आ दे श ::**

०१. आरोपी क्र. १ राजेंद्र अजित चव्हाण व आरोपी क्र. २ छाया अजित चव्हाण यांची भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २७१ नुसार भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३) सह कलम ३(५) अन्वये शिक्षेस पात्र अपराधातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

०२. आरोपीने यापुर्वी दिलेला जामीन कदबा रद्द करुन त्यांस खुले करण्यात येते.

०३. आरोपींनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ४८० अन्वये रुपये पन्नास हजार प्रत्येकी इतक्या रकमेचे नविन बंधपत्रे व जामिनपत्रे दाखल करावेत.

०४. सदर गुन्ह्यात जप्त मुद्देमाल एक लाकडी काठी ही मुल्यहिन असल्याने अपिल कालावधीनंतर नष्ट करण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात लिहणेत व घोषित करण्यात आला.)

JADHAV MEENA WAMAN
Digitally signed by JADHAV MEENA WAMAN
Date: 2026.08.05 17:54:38 +0530

**ठिकाण : भोर** **( मीना वा. जाधव )**

**दिनांक :०५.०८.२०२६.** **न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, भोर**

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अशी खात्री देतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर मुळ आदेशाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | — | एम.एस. कोंढरे, नि.श्रे. |
| न्यायालयाचे नाव | — | मे. श्रीमती एम.व्ही. जाधव, प्र.वर्ग. न्या.दं. भोर |
| निकाल तारीख | — | ०५.०८.२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केल्याची तारीख | — | ०५.०८.२०२६ |
| अपलोड केल्याची तारीख | — | ०५.०८.२०२६ |